जा.क्र. का. 15/वामूदत-2016-17/मार्गदर्शक सूचना/ परिपत्रक/ 304
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकिय इमारत, तळमजला,
पुणे-1
दि. 31 /03/2016.

**विषय:-** शासनमान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था, कृषी महाविद्यालयासाठी खरेदी करत असलेल्या जमिनींचे मूल्यांकनाबाबत.

महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम 1995 मधील तरतूदीनुसार वार्षिक मूल्य दर तक्ते तयार केले जातात. वार्षिक मूलय दर तक्त्याची ग्रामीण, प्रभाव व नागरी अशा ती प्रकारात विभागणी केली जाते.

प्रभाव / ग्रामीण क्षेत्रातील शासनमान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था कृषी महाविद्यालयासाठी खरेदी करत असलेल्या जमिनीपैकी, प्रत्यक्ष बांधकामासाठी वापरात येणारे क्षेत्र व प्रत्यक्ष शेती संशोधनासाठी उपयोगात आणणेत येणारे क्षेत्र इ. चा विचार करुन अशा जमिनींचे मूल्यांकनाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**1) खरेदी होणारे क्षेत्र प्रभाव क्षेत्रातील असल्यास:-**

अ) खरेदी होणारे क्षेत्र वार्षिक मूल्य दर तक्त्यात 'संभाव्य बिनशेती' मूल्य विभागात असलेस, खरेदी होणाऱ्या संपूर्ण क्षेत्राचे मूल्य, प्र. चौ.मी. व प्र. हे. असे दान्ही दर असल्यास संभाव्य बिनशेती दराने सूचना क्र. 16 (अ) व केवळ प्र. चौ.मी. दर असल्यास संभाव्य बिनशेती दराने सूचना क्र. 16 (ब) वापरुन परिगणित करणेत यावे.

ब) खरेदी होणारे क्षेत्र 'जिरायत जमिनी' या मूल्य विभागात समाविष्ट असलेस, एकूण क्षेत्रापैकी 10% क्षेत्राचे मूल्य, सारख्या गुणदोष असलेल्या लगतच्या जमिनींकरिता असणाऱ्या संभाव्य बिनशेती मूल्य विभागातील दराने सूचना क्र. 16 (अ) अथवा 16 (ब) जे वरीलप्रमाणे लागू असेल ते वापरून परिगणित करणेत यावे आणि उर्वरित क्षेत्राचे मूल्य जिरायत जमिनीच्या दराने परिगणित करणेत यावे.

**2) खरेदी होणारे क्षेत्र ग्रामीण क्षेत्रातील असल्यास:-**

खरेदी होणाऱ्या एकूण क्षेत्रापैकी 10% क्षेत्राचे मूल्य दर तक्त्यातील सदर गावाच्या बिनशेती दराच्या 50% दराने व सूचना क्र. 16 (अ) स्थूल जमिनीचे कोष्टक वापरून

परिगणित करावे आणि उर्वरित क्षेत्राचे मूल्य हेक्टरी आकारानुसार येणाऱ्या प्रति हेक्टर दराने परिगणित करणेत यावे.

उक्त परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
(डॉ. रामास्वामी एन. )
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा. सचिव (मदत व पुर्नवसन ) महसूल विभाग, मंत्रालय मुंबई - 32.
2) मा. महालेखाकार (लेखापरिक्षा) -II, महाराष्ट्र, नागपूर. यांना माहितीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी:-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) सहाय्यक संचालक नगर रचना, मूल्यांकन, पुणे/कोकण/नागपुर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती.
5) उपसंचालक नगर रचना, मुंबई प्रदेश, मुल्यांकन, मुंबई
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (संगणक), पुणे.
   सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे /कोकण /नागपुर /नाशिक/ औरंगाबाद/ लातूर/ अमरावती.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
10) श्रीमती. निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता